नियमित दिवाणी दावा क्र. १३५/२०१८ मधील
निशाणी क्रमांक २३ वर आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ६ नियम १७ सह आदेश ०१ नियम १० प्रमाणे दाखल केला असुन दाव्यामध्ये दुरूस्तीची परवानगी मागितली आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, दाव्यातील वादी क्रमांक २ गोविंद येसू कडू हे दिनांक २५/०१/२०१९ रोजी मयत झाले असून, अर्जातील नमुद व्यक्ती त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब, त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करुन घेवून दाव्यात तशी दुरुस्ती करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी यांनी निशाणी २३ वरच त्यांचे म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश पारीत करण्याची अर्जास हरकत घेतली आहे.

०४. उभयपक्षकारांच्या संमत्तीने युक्तीवाद ऐकून अर्ज आदेशाकरीता घ ेतला. अर्ज व त्यावरील म्हणणे व संबंधीत शपथपत्राचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तिवाद सविस्तर ऐकला.

०५. सदर प्रकरणात वादी यांनी मागितलेली दुरूस्ती ही औपचारीक दुरुस्ती असून त्यास मुदतीची अथवा इतर कसलीही कायदेशीर बाधा नाही. सदर दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची आहे. प्रतिवादी यांनी केवळ हरकत नोंदविली आहे. हरकतीस

कारण नमुद केलेले नाही. सदर दुरूस्ती केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही अपरीमित नुकसान होणार नाही. दुरूस्ती केल्या शिवाय प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघू शकत नाही. त्याचप्रमाणे त्यामुळे प्रतिवादी यांच्यावर कोणताही अन्याय अथवा प्रतिवादी यांच्या हक्काचे हनन होणार नाही. वादी यांनी अर्ज दाखल करताना अप्रामाणिकपणा केला आहे असे म्हणण्यास वाव नाही. सबब दुरूस्ती करण्यास कायदयाची कोणतीही बाधा नाही. त्याअनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा निशाणी २३ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी यांना निशाणी २३ वरील अर्जाच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली दावा दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ३. | वादी यांनी सदर दावा दुरूस्ती आदेश निर्गमित केल्यापासून १४ दिवसांच्या आत म्हणजेच दि. ११.१२.२०२१ अथवा त्यापुर्वी करणे वादी यांच्यावर बंधनकारक आहे. दावा दुरूस्ती केल्यानंतर दुरूस्त दाव्याची प्रत तात्काळ प्रतिवादी यांना देण्यात यावी. |

सही/–
( प्रितेश देशपांडे )
**सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पेण.**

दि. २७.११.२०२१
पेण